# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २९३ - २३** **दिनांक : - ०१/०९/२०२३**

**नकली सोने असली असल्याचे भासवुन फसवणुक करणाऱ्या आरोपीतास जि. नर्मदापुरम राज्य मध्यप्रदेश येथुन अटक करण्यात पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.**

फिर्यादी शोभराज शिवानंद सोनी, वय ५२ वर्षे, यांच्या ज्वेलर्स दुकानात यातील आरोपीत व त्यांच्या साथीदारांनी येऊन त्यांच्याकडे असलेले १९.२०० ग्रॅम वजनाची नकली सोन्याची चैन ही असली सोन्याची असल्याबाबत फिर्यादी यांना भासवुन फिर्यादी यांचे दुकानातुन नकली सोन्याच्या चैनच्या बदल्यात सोन्याचे १३.२५० ग्रॅम वजनाचे मंगळसुत्र व ६.२७० ग्रॅम वजनाचे डबलकडीचे पँडल असे एकुण १९.५२० गॅम वजनाचे सोन्याचे दागिणे घेऊन जाऊन फिर्यादी यांची फसवणुक केलेबाबत यातील फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. I २४३/२०२३ भा.दं.वि.स कलम ४२०, ३४ प्रमाणे दिनांक १०/०३/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

वर नमुद गुन्हयाचे तपासाच्या अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषणच्या व गुप्त बातमीदारांच्या मार्फतीने मिळालेल्या माहीतीच्या आधारे सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे - राजकुमार प्रदीप सोनी, वय २३ वर्षे, रा. इटारसी जि. नर्मदापुरम राज्य मध्यप्रदेश. येथुन सदर गुन्हयाचे कामी अटक करुन त्यांच्याकडुन ६०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ- ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. विजय पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शिवानंद देवकर, पोलीस निरीक्षक (प्रशासन) पेल्हार पोलीस ठाणे, स.पो.नि.सोपान पाटील, पो.हवा.योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पो.अं.रवि वानखेडे, संजय मासाळ, निखील मंडलिक, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, सुजय पाटील, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

**----0000----**